शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २११ । रविवार, दि.२७ जुलै २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## जयंत पाटलांचा मुख्यमंत्र्यांना चिमटा

**नागपूर ।** कुणाचा राजीनामा घ्यायचा, कुणाचा नाही, मुख्यमंत्र्यांनी हे ठरवायचे आहे. आम्ही विरोधात आहोत. आम्ही विचार करून काही होणार नाही. सरकार कसे चालवायचे, हे मुख्यमंत्र्यांनी ठरवायचे आहे. मुख्यमंत्र्यांची सहनशीलता किती आहे आणि या सगळ्यासंदर्भात ते काय निर्णय घेतात, याची आम्ही वाट पाहात आहोत, असा चिमटा शरद पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी काढला. नागपुरात आले असता आ. जयंत पाटील पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले.




## थोडक्यात

### शिरसाट-मिसाळ वादात मुख्यमंत्र्यांची मध्यस्थी

**मुंबई ।** सामाजिक न्याय खात्यातील अधिकार तसेच शासकीय बैठकांच्या मुद्द्यावर या खात्याचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात निर्माण झालेल्या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी मध्यस्थी केली. या मध्यस्थीनंतर दोन्ही मंत्र्यांनी आपापसातील वादावर पडदा टाकला. विभागाच्या बैठकांवरून संजय शिरसाट आणि माधुरी मिसाळ यांच्यातील वाद शुक्रवारी उघड झाला. सामाजिक न्याय विभागाच्या बैठका आपल्या पूर्वपरवानगीने आणि आपल्याच अध्यक्षतेखाली व्हाव्यात, असे पत्र लिहून शिरसाट यांनी मिसाळ यांना कॅबिनेट मंत्र्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली होती. मात्र, मिसाळ यांनी या पत्राला उत्तर देताना, विभागाच्या बैठका घेण्यासाठी आपल्या पूर्वपरवानगीची गरज नसल्याचे शिरसाट यांना सुनावले होते.

### आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३३७ कोटी!

**मुंबई ।** राज्यात फेब्रुवारी ते मे २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटीचा तडाखा ३ लाख ९८ हजार ६०३ शेतकऱ्यांना बसला होता. यामुळे १ लाख ८७ हजार ५३.२१ हेक्टर क्षेत्रातील शेत पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीच्या मदतीपोटी राज्य सरकारने ३३७ कोटी ४१ लाख ५३ हजार रुपये इतक्या निधीस मान्यता दिली असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी शनिवारी दिली.

## ‘देशदूत’चा उपक्रम : ‘रायझिंग स्टार अवॉर्ड’ सोहळा उद्या ‘व्हिएतनाम’मध्ये रंगणार




**नाशिक ।** कार्यकर्तृत्व, समाजसेवा आणि विविध व्यावसायिक कौशल्यांचा आपापल्या क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या उदयोन्मुख व्यक्तींचा ‘व्हिएतनाम’च्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ‘देशदूत’ व ‘सार्वमत’तर्फे ‘रायझिंग स्टार अवॉर्ड’ देऊन गौरव करण्यात येणार आहे. हा सोहळा दा नांग सिटी येथे उद्या सोमवार दिनांक २८ रोजी होणार आहे.

विविध क्षेत्रातील उदयोन्मुख व्यक्तींच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी ‘देशदूत’ माध्यम समूहातर्फे या वर्षापासून ‘रायझिंग स्टार अॅवॉर्ड’ प्रदान केले जाणार आहेत. वैयक्तिक पातळीवर बिआँड बॉर्डर्स अर्थात देशाच्या सीमेपार गौरविणारा ‘देशदूत’ माध्यम समूहाचा हा पहिलाच पुरस्कार आहे. जगभरातील पर्यटकांचे आकर्षण बनलेले व आशिया खंडातील ‘युरोप’ म्हणून नावारुपास येऊ लागलेल्या ‘व्हिएतनाम’मधील ‘दा नांग’ या शहरातील समुद्र किनाऱ्यावरील नयनरम्य अशा तारांकित हॉटेलमध्ये ‘रायझिंग स्टार अॅवॉर्ड’ सोहळा होत आहे. व्हिएतनाम पर्यटन प्रोत्साहन केंद्राच्या उपसंचालक माई थी थान खास या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

प्रतिष्ठेच्या या सोहळ्यात नाशिक ‘देशदूत’चे सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे, जाहिरात महाव्यवस्थापक अमोल घावरे, सहायक जाहिरात महाव्यवस्थापक (ग्रामीण) सचिन कापडणी उपस्थित राहतील.

### यांचा होणार गौरव

- अॅड.डॉ.वैभव शेटे,नाशिक
- शंकरराव वाघ,निफाड
- सुनील पाटील,दिंडोरी
- सोमनाथ सोनवणे,दिंडोरी
- अक्षय रमेश वडनेरे,नाशिक
- अथर्व चिंतामणी,नाशिक
- डॉ.नीलेश निकम,नाशिक
- जयेश मेहता,मुंबई
- अमोल देशमुख,दिंडोरी
- प्रतिक क्षत्रिय,सिन्नर
- अभिजित कृष्णा दुसाने,निफाड
- श्रीरंग खुळे,सिन्नर
- वीरेंद्र नानासाहेब थोरात,अकोले,अहिल्यानगर
- रावसाहेब वाकचौरे,अकोले,अहिल्यानगर
- गणेश सोपान मैड,लोणी,अहिल्यानगर

# लोढाकडेच सीडी म्हणून फौज वेडीपिशी!

## आ.एकनाथराव खडसेंचा महाजन समर्थकांवर पलटवार



**जळगाव ।** शुक्रवारी जळगावमध्ये भाजप आमदारांनी एकत्र पत्रकार परिषद घेतली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना आमदार मंगेश चव्हाण यांनी राष्ट्रवादीचे नेते आ.एकनाथराव खडसे यांच्यावर गंभीर आरोप केले, अन्य आमदारांनी देखील आरोप केले. त्यानंतर शनिवारी एकनाथराव खडसे यांनी देखील पत्रकार परिषद घेत भाजपवर जोरदार हल्लाबोल केला, यावेळी बोलताना ते म्हणाले की माझ्या विरोधात ज्यांनी पत्रकार परिषद घेतली त्यांच्या विषयी मी जास्त बोलणार नाही.त्यांना नाईलाजाने बोलावे लागले.मी एकटाच बोलतोय पान २ वर

### महाजनांनी माझे चॅलेंज स्वीकारावे!

ते म्हणाले की, गिरीश महाजन यांनी माझे चॅलेंज स्वीकारावे, प्रफुल्ला लोढाची नार्कोटेस्ट करावी, महाजनांच्या संपत्तीची चौकशी व्हावी. एका वाघा पुढे यांना लांडग्याची फौज उभी करावी लागते पण वाघ तो वाघ असतो. गिरीश भाऊ म्हटले होते की विषय संपला मात्र प्रफुल्ल लोढा जेलमध्ये आहे तोपर्यंत हा विषय संपणार नाही. गिरीश महाजन यांनी माझ्यावर ईडी संदर्भात खोटे गुन्हे दाखल केले, मला अडकवण्याचे काम महाजनांकडून झाले.

### तर राजकारणातून निवृत्ती घेईल!

मी १९८० पासून ते आतापर्यंत सक्रिय राजकारणात आहे. मी जवळपास ४५ वर्षांपासून राजकारणात आहे. मी मंगेश चव्हाणांना आव्हान करतो की, तुमच्याकडे माझ्यासंदर्भात एक छोटी गोष्ट देखील पुरावा म्हणून असेल तर ती समजासमोर दाखवा, गप्पा मारू नका. जर तुम्ही पुरावा दिला तर मी सक्रिय राजकारणातून सन्यास घेईल असे आव्हानच खडसे यांनी आता चव्हाण यांना केले आहे.

### राजूमामा विसरले असतील!

राजूमामा कदाचित विसरले असतील २०१४ च्या निवडणुकीत सर्वांचा विरोध असताना त्यांना तिकट मिळवून दिले होते. कारण त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल होते मी पुन्हा सांगत नाही पण पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारली असताना मी नेत्यांना समजावले त्यानंतर त्यांना उमेदवारी मिळाली .आज टीका करताय पण सत्य जनतेसमोर आहे.

### महाजन अर्ध्या खात्याचे मंत्री!

गिरीश महाजन म्हणतात मी ३५ वर्षापासून आमदार आहे. मी ३६ वर्षात आहे. गिरीश महाजन हे अर्ध्या खात्याच्या मंत्री आहेत. मी १८ खात्यांचे कॅबिनेट मंत्रीपद भोगले आहे. गिरीश भाऊ अर्ध्या खात्याचे मंत्री आहेत. त्यांना पूर्ण खात सुद्धा मिळालं, असा टोला त्यांनी गिरीश महाजन यांना लगावला.

## सैन्यात नव्या रुद्र अन् भैरव ब्रिगेडची घोषणा



**लडाख ।** द्रास येथे २६ व्या कारगिल विजय दिनानिमित्त भारतीय लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी संबोधित करताना भारतीय सैन्याच्या भविष्यातील आराखडा सांगितला आहे. भविष्यात भारताची रुद्र ब्रिगेड शत्रूंसाठी धोकादायक ठरणार असल्याचे जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटले. येत्या काळात भारतीय सैन्य अधिक शक्तिशाली होईल, असेही लष्करप्रमुख म्हणाले. ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करताना भारताने दहशतवाद्यांचा पराभव केला असल्याचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणाले.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान केलेले सर्जिकल स्ट्राईक म्हणजे पाकिस्तानला थेट संदेश होता की दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना सोडले जाणार नाही. ऑपरेशन सिंदूर हे पहलगाम दहशतवादी हल्ल्याला दिलेले प्रत्युत्तर होते, ज्याने संपूर्ण देशाला दुखावले होते. यावेळी भारताने या घटनेवर दुःख व्यक्त केले आणि योग्य उत्तरही दिले. शत्रूला प्रत्युत्तर देणे आता न्यू नॉर्मल झाले आहे, असे जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटले. सैन्यात रुद्र ब्रिगेडची स्थापना केली जात आहे. मी कालच त्याला मंजुरी दिली. याअंतर्गत, आपल्याकडे एकाच ठिकाणी इन्फन्ट्री, मेकॅनिकल इन्फन्ट्री, आर्मर्ड युनिट्स, तोफखाना, विशेष दल आणि मानवरहित एरियल युनिट्स असतील जे रसद पुरवतील.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2275 |
| नवती (२) | : 2075 |

## मिरकिली




## राजकारण हा फुकट्यांचा बाजार-गडकरी



**नागपूर ।** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे ओळखले जातात. एखादी गोष्ट पटली नाही की ते थेट सांगतात. त्यांच्या कामाचा वेग, त्यांच्याकडे असलेल्या खात्याविषयी असलेली असलेली इत्यंभूत माहिती, तोंडपाठ असलेली आकडेवारी यामुळे गडकरी कायम चर्चेत राहणारे केंद्रीय मंत्री आहेत. गडकरी हे असे नेते आहेत, ज्यांच्या प्रत्येक शब्दाला किंमत आहे. दरम्यान, त्यांनी आता नागपुरात बोलताना मोठे विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचे अनेक अर्थ काढले जातात. माझ्या अनुभवातून लक्षात आलंय की सरकार निकम्मी असते, असे ते भाषणात म्हणाले आहेत.

मला नागपुरात खेळाचे ३०० स्टेडियम बनवायचे आहेत. पण माझ्या चार वर्षांच्या अनुभवातून हे लक्षात आले की सरकार निकम्मी असते. महानगरपालिका, एनआयटी यांच्या भरवशावर काही काम होत नाही. चालत्या गाडीला पंक्चर करण्याचे महारथ यांच्याकडे आहे, असे नितीन गडकरी म्हणाले. तसेच, मी राजकारणात आहे. हा फुकट्यांचा बाजार आहे. प्रत्येक गोष्ट फुकटची पाहिजे असते. पण मी फुकटंच देत नाही, असे म्हणत त्यांनी देश तसेच राज्यातल्या राजकारणावर भाष्य केले.




### राजकीय संकटातून मुक्तीसाठी

## ना.माणिकराव कोकाटे शनिचरणी लीन



**नंदुरबार ।** गेल्या काही महिन्यांपासून वेगवेगळया राजकीय विधानांमुळे चर्चेत आलेले राज्याचे कृषिमंत्री आणि नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज तालुक्यातील प्रसिद्ध शनीमांडळ येथील शनिदेवाच्या मंदिरात जाऊन विशेष पूजा-अर्चना केली. सध्या विविध कारणांमुळे राजकीय संकटात सापडलेल्या कोकाटे यांनी आपल्यावरील व लोकांवरील साडेसातीचे संकट दूर व्हावे, यासाठी शनिदेवाला प्रार्थना केली. त्यांच्या या नंदुरबार दौऱ्याची आणि शनिपूजेची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

गेल्या काही महिन्यांपासून कृषिमंत्री ना.माणिकराव कोकाटे हे शेतकऱ्यांविषयीची कथित वादग्रस्त वक्तव्ये आणि विधिमंडळात पत्ते खेळतानाच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे चर्चेत आहेत. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर ना.कोकाटे यांचा नंदुरबारचा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. तालुक्यातील शनीमांडळ गावात भेट देवून ना.कोकाटे हे शनिचरणी लीन झालेले दिसून आले. त्यांनी मंदिरात विधीवत पूजा करून शनिदेवाचा अभिषेक केला. यावेळी त्यांनी लोकांवरची साडेसाती दूर व्हावी, सोबतच आमच्यावरचेही संकट दूर, अशी प्रार्थना त्यांनी केली. देशातील साडेसाती मुक्त देवस्थान म्हणून शनीमांडळची ख्याती असल्याने, राजकीय अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी कोकाटे यांनी शनिदेवाला साकडे घातल्याचे बोलले जात आहे. यावेळी कोकाटे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत पान २ वर